
किल्ले रायगड
ओढ शिवतीर्थ रायगडाची....!
लेखक : अनिल महादेव पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

किल्ले रायगड

(प्रवासवर्णन)

लेखक : अनिल पाटिल

किल्ले रायगड

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

किल्ले रायगड

लेखक : अनिल पाटिल

ई – मेल : anil85.patil@gmail.com

दुरध्वनी क्र. : ७२०८७२११७०

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३१ जानेवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



कै. महादेव गोया पाटील

यांना

।। भावपुर्ण श्रद्धांजली ।।

काही प्रथा या आपण आपल्या एका पिढीपासुन दुसऱ्या पिढीत नेत असतो त्याला काही ऐतिहासिक, सामाजिक तर काही कौटुंबिक व्याख्या असतात. दिनांक : ०१/११/१९६२ या दिवशी माझ्या वडिलांचा स्व. श्री महादेव गोया पाटील यांचा जन्म पाभरे (कोळीवाडा) या ठिकाणी झाला. याच तारखेला दुग्धशर्करा योग म्हणजे आमच्या गावातील "श्री लक्ष्मी नारायण" मंदिराचा पहिला जीर्णोद्धार सुद्धा याच दिवशी झाला. हीच ओळख प्रत्येकाच्या मनात अजुनही आहे. परमार्थाची ओढ व प्रत्येक देवतांची निस्सीम भक्ती आमच्या घरात चालू झाली होती.

वडिलांना लहानपणापासुन वाचनाची आवड असल्याने संस्कृत विषयावरही त्यांची जरब होती. त्यामुळेच अनेक शास्त्र-पुराणांचे गाढ अभ्यासक व उत्तम वक्ते म्हणूनही नावारूपास आले. माझे वडील म्हणजे शास्त्र-पुराणांचा सागर असे एक समीकरणच बनले होते. ते आजही पंडित या नावाने कित्येकांच्या मुखात अजरामर आहेत. त्याच ओघात भरपुर काव्ये लिहिली त्यालासुद्धा भक्तीची अजोड अशी किनार होती. आमच्या गावामधील "श्री विष्णुसागर भजन-मंडळाचे" *आधारस्तंभ होते. काव्याबरोबरच भजन, लिहिणे, गाणे, लिहिणे तमाशातील पात्रांचे संवाद लिहिणे हे जोडूनच आल होतं.*

माझं दुर्दैव कि मला माझ्या वडिलांचा जास्त सहवास लाभला नाही, पण हि वंशपरंपरागत अद्‌भुत शक्तीचा केवळ थोडासा अंश माझ्या लेखणीतुन अवतरला हे माझे परम सौभाग्य. त्यांची स्मृती हेच माझ्यासाठी अलौकिक ठेवा आहे.

माझे हे पहिले लेखन मी माझ्या वडिलांच्या चरणी भावपुर्ण अक्षरांनी समर्पित करतो.

लेखक : अनिल महादेव पाटील

ई – मेल : anil85.patil@gmail.com

दुरध्वनी क्र. : ७२०८७२११७०

अक्षरजुळवणी व छायाचित्रे :
अनेश महादेव पाटील

किल्ला रायगड, फक्त नाव उच्चारले तरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कतृत्वाने घेतलेली झेप लक्षात येते. हिंदवी स्वराज्य स्थिर झाले तो किल्ला म्हणजे रायगड. या रायगडावर जायचा विचार करणे म्हणजे तीर्थ-क्षेत्रावर जाणे. या ठिकाणी जायला सिद्ध झालो तेव्हा आईने गोड प्रसाद भरवला. मोहिमेलाच जात आहोत असच वाटू लागलं आणि आमचा प्रवास सुरु झाला. रायगडावरच्या प्रत्येक दगडामध्ये इतिहास हा भरून आहे. प्रत्येक स्थान हे महाराजांच्या स्पर्शाने नाहीतर पायधुळीने पावन झालेच असतील म्हणून किल्ल्यावरच्या हरएक स्थानाला महत्त्व आहे.

मला भावलेले मुख्यतः तीन भाग, पहिला म्हणजे हिरकरणीचा बुरुज. या बुरुजावर गेल्यावर एक आईच्या वात्सल्याची जाणीव झाली. दुसरा म्हणजे राजभवन कारण याच ठिकाणी हिंदुत्व जागवणारा सार्वभौम महाराजांचे सिंहासन होत, आणि तिसरं ठिकाण म्हणजे श्रीची समाधी. हि फक्त समाधी नव्हती तर अखंड मराठी साम्राज्याचे शक्तीस्थान होते. वडिलांपासून दुरावलेल्या श्री संभाजी राजांचे अखंड पूजनीय असे स्थान होते.

जेव्हा आम्ही रायगड किल्ला फिरून श्री समाधीचे दर्शन घेतल्यावर जी मनात एक निरंतर समाज सेवेची भावना निर्माण झाली आणि एका नव्या पर्वाची सुरवात झाली. हा प्रवास शब्दात लिहिण्याचं पहिला प्रयत्न केलाय. काही चुकले असेल तर क्षमस्व .....

|| श्री ||

किल्ले रायगड

ओढ शिवतीर्थ रायगडाची...!

रायगड किल्ला म्हणजे... छत्रपती शिवाजी महाराजांची दुसरी राजधानी. स्वराज्याचा स्वर्ग म्हणजे हा किल्ला रायगड, ज्याची निर्मितीच इतक्या तत्परतेने आणि ऐच्छिक सुखाची तमा न बाळगता म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील इंद्रनगरी वसवण्यासाठी स्वतःचे घर विकणारे आणि बदल्यात महाराजांची पायधूळ लागावी म्हणुन जगदीश्वराच्या पायरीवर नाव कोरून घेणाऱ्या निष्ठावंत हिरोजी इंदुलकरांची भव्यतम कल्पकता. ज्यामध्ये सेवानिष्ठा ओतप्रेत भरून उरलेली असा हा रायगड किल्ला. अशा आपल्या रायगड किल्ल्याने हिंदवी स्वराज्याचे पहिले छत्रपती श्री शिवाजी राजांचा राज्याभिषेक अनुभवला. याच रायगड किल्ल्याने छत्रपती संभाजी महाराजांची घोडदौड पाहिली. माँ जिजाई साहेबांचा श्वास ही ज्याने अधीरतेने सोसला. अनेक अर्थकारण, राजकारण या किल्ल्याने अनुभवले.

मराठी माणसांनी एका मराठी राजासाठी रक्त सांडून स्वराज्यासाठी अभिषेक केला तीच ही रायगड किल्ल्यावरची माती . प्रत्येक पावसाच्या सरीत या मातीचा सुगंध महाराष्ट्रातच नाही तर शिवाजी राजांच्या सद्गुणांची उपासना ज्या ठिकाणी होते त्या हर एक ठिकाणी दरवळते. आणि हीच माती मस्तकी लागावी म्हणून ठरविले की कलियुगातील मानवी नितीमूल्यांचा

मुर्तीमंत स्वर्ग याची देही याची डोळा पाहावा...

दिवस ठरला आणि ठरल्याप्रमाणे आम्ही सर्वजण माणगांव मध्ये भेटण्याचे ठरले. आम्ही माझ्या पाभरे (कोळीवाडा) या राहत्या गावामधुन पाच शिवभक्त पिकअप घेऊन माणगांव कडे निघालो. मुंबईहून सगळी सैराट टीम माणगांवमध्ये आमच्या आधीच येऊन पोचली होती. चहा-नाश्ता केल्यावर माणगांव सोडले व महाडचा प्रवास सुरु झाला. जवळ-जवळ महाडच्या आसपास ठीक सकाळी ४.०० वाजता पोहोचलो. आमच्या मित्राने जो स्वतः चालक होता त्याने विचारपूस केली व गाडी सुरू केली . पण दाट धुक्याने तो रस्ता चुकला व आम्ही अशा ठिकाणी पोहोचलो ज्या ठिकाणी मार्गदर्शन फलकावर दिसत होते की महाबळेश्वर फक्त ४९ की.मी. सर्वांच्या मतानुसार आम्ही महाबळेश्वर प्रथम व नंतर रायगड असे ठरवले आणि इकडेच एक मोठी चूक नकळत आमच्या हातून घडली. प्रवास सुरु झाला. महाबळेश्वर मंदिर पाहिले. पाच नद्यांचा संगम होऊन गोमुखातून येणारे पाणी तीर्थ म्हणुन प्यायलो. महाबळेश्वर फिरण्यास सुरवात केली. दुपारी जेवण झालं व महाबळेश्वर पायथ्याशी परत येईपर्यंत दुपारचे २.०० वाजले होते.

मग पुन्हा ठरले की इकडून फक्त १३ की.मी. अंतरावर असलेला प्रतापगड पहायचा व रात्री रायगडावर मुक्काम करायचा. त्यानंतर आम्ही सर्वजण प्रतापगडाच्या दिशेकडे निघालो. प्रतापगडावरील भवानी मातेच्या दर्शनाने मन तृप्त झाले . जावळीचे खोरे रौद्ररूपासारखे भासु लागले. क्षणभर अफजलखानाच्या वधाचा दिवस आठवला व मन इतिहासाच्या पानात हरवून गेले. थोड्या वेळाने प्रतापगड उतार होऊन नाश्ता केला व सर्वजण रायगड दर्शनासाठी निघालो.

आणि पुन्हा एकदा अनपेक्षितपणे वाट चुकलो व पुन्हा अशा ठिकाणी पोहोचलो की जिथं शिवथर घळ अगदी जवळ होती. रायगड किल्ला आम्हाला सारखी हुलकावणी देत होता आमच्या रायगड दर्शनात थोडासा बदल करून आता शिवथर घळ पहायचे ठरले व शिवथर घळला पोहोचलो. ज्या ठिकाणी समर्थ रामदास स्वामींनी "श्री-मत दासबोध" हा महान ग्रंथ लिहिला त्या ठिकाणी नतमस्तक झालो व परतीला निघालो. निघताना ठरलं होतं की आता रायगड किल्ल्यावर जायचं म्हणजे जायचंच....

पण नियतीला काही औरच हवं होत. आम्ही अनपेक्षितपणे पुन्हा वाट चुकलो व जवळ-जवळ रात्री १०.३० वाजता महाड एस-टी स्थानकात पोहोचलो. सर्वांचे जेवण

होईपर्यंत रात्रीचे ११.३० वाजून गेले होते. पूर्ण फिरून-फिरून सर्वांच्या मुखावर झोपेची काळी सावली दिसत होती. सगळे थकून गेले होते. कोण म्हणतं होते की रायगड किल्ल्यावर जायचं तर कोणी नाकारत होत. यात एकमेकांचा वाद विकोपास गेला व अखेर ठरले की रायगड किल्ल्यावर आता जायचं नाही नंतर जायचं व निराश मनाने मी परतीचा प्रवासाला निघालो.

त्या वेळी मन अतिशय उद्विग्न झालं होतं. लगाम नसलेला घोडा जसा चौफेर धावतो त्याप्रमाणे मन चौफेर सैरावैरा धाऊ लागलं. मित्रांना भरपूर दोष दिला पण नियतीलाच जर मान्य नसेल तर कितीही प्रयत्न केले तरी अपयश हाती येणारचं, पण म्हणून प्रयत्न करायचे सोडून द्यायचे का...? हा प्रश्न मनाला सतावू लागला आणि ठरलं की जो येईल तो... आणि कोण सोबत असेल तो... सोबत आले तर ठीक नाहीतर एकटे जाऊ पण या महिन्यातच रायगडावर जाऊन यायचे..

नंतर मनात आलं की छत्रपती शिवाजी महाराजांच्याच मनातच नसेल का हे.... कारण अगोदर रायगडाच्या दिशेने येताना वाट चुकली व जिथे महाबळी रावणाने साक्षात शंकराकडून प्राप्त झालेल्या दिव्य शिवलिंगाची स्थापना केली त्या दिव्य अशा शिवलिंगाचे दर्शन घडले, पाच नद्यांच्या संगमाने गोमुखातुन एकत्र येणाऱ्या अमृतमय असे पवित्र तीर्थ ग्रहण करून पावन झालो व नंतर छत्रपती शिवाजी राजांच्या महापराक्रमाची शौर्यगाथा जिथे लिहिली गेली त्या ठिकाणी जाऊन माता आई भवानीचे मर्दानी रूप डोळ्यात साठवुन घेतले. आणि त्यानंतर छत्रपती शिवरायांचे अध्यात्मिक सद्गुरू श्री समर्थ रामदास स्वामींनी ज्या ठिकाणी मानवी देहाला घडवण्यासाठी "श्रीमत दासबोधाची" निर्मिती केली. तिकडे जाऊन देहातील वाईट विचारांवर विजय मिळवला, देहाने-मनाने व अंतःकरणाने शुचिर्भूत होऊनच रायगडावर न्यायचं होत की काय... असच वाटू लागलं..

आणि मग पुन्हा दिवस ठरला व निघालोय पण मोजकेच ज्या प्रमाणे शिवरायांच्या शब्दाचा आघात मनात खोलवर झालेले आपल्या स्वराज्याचे पहिले सरसेनापती "फक्त सात" मावळ्यांसोबत यवनांच्या सागरात लाट यावी तसे विरून गेले त्याचप्रमाणे निघालो. यावेळी आम्ही निघालो होते ते फक्त हातावरच्या बोटांवर

मोजण्या येण्या इतकेच फक्त अकरा पण सोबतीला हिंमत होती ती शिवरायांची आणि म्हणुनच.....

ओढ लागली रायगडाची...

स्वराज्याच्या मायभूमीची.....

शिवरायांच्या अतुलनीय महापराक्रमाची.....

ज्यात भक्ती होती स्वामी-निष्ठेची.....

आता रायगडाची आनंदीक आणि अनामिक ओढ लागलीच होती पण त्यासोबत एक अनोखी जबाबदारी सुद्धा आमची पाठ सोडत नव्हती. ती म्हणजे तिकडे खाण्यापिण्याची सोय होणं हे जितके महत्वाचे होते त्याहून सर्वाना सुखरूप परत आणणे हे जास्त महत्वाचे होते. कारण आमच्यातले बहुतेक हे मावळे पहिल्यांदाच रायगडावर येणार होते. म्हणून आम्ही ठरवले कि पनवेलहुन महाराष्ट्राची लाल परी पकडायची आणि पाचाडला उतरायचे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य परिवहन मध्ये सगळ्याच्या सीट आरक्षित केल्या.

रायगडाच्या मोहिमेची तारीख ठरली ती दिनांक २७ जानेवारी २०१८, ठरल्याप्रमाणे आम्ही सगळे मावळे पनवेल (S.T.) आगारात वेळेच्या किमान अर्धा तास अगोदर पोचलो. वेळेचं महत्व काय असते ते मी जाणून होतोच कारण जेव्हा शिवरायांनी दिनांक ११ जून १६६५ ला मिर्झा राजा जयसिंग सोबत पुरंदरचा तह केला त्या तहासोबत स्वराज्याचे २३ किल्ले, आग्राला भेट देण्याचे तसेच दक्षिणेकडील लढाईत मुघलांना मदत करण्याचे मान्य केले व चार लाख होनांचा प्रदेश मोघलांना द्यावा, त्यानुसार जेव्हा विजापूरवर चालून जायचे ठरल्यावर पहिला पन्हाळा गड घ्यायचे ठरले. पण गडावरचा किल्लेदार फार सावध होता त्याचवेळी स्वराज्याचे पहिले सरनौबत नेताजी पालकर हे वेळेवर पोहोचले नाहीत आणि त्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पराभव झाला. जवळ-जवळ १००० मावळे नाहक मारले गेले. याचा राग अनावर होऊन

शिवराय नेताजी पालकरांवर फार चिडले आणि त्यांना पत्राद्वारे लिहिले कि "समयास कैसा पावला नाहीस" असे म्हणून बडतर्फ केले. एक लहानशी चूक पण त्याला शिक्षा इतकी मोठी. म्हणून वेळेचे महत्व कायमच मनात ठासून होतो.

आम्ही वेळेच्या अगोदर पोहोचलो होतो पण आमची (S.T.) च उशिराने धावत होती. मग चहाचा घोट घेत आठवण म्हणुन (S.T.) आगारात २-३ फोटो काढले. अर्ध्या -एक तासाने आम्ही जिची वाट पाहत होतो ती लाल परी आली. लाल परी समोर श्रीफळाचा प्रसाद दिला आणि एक मोठाले हार लाल परीला घातले. आमच्या सर्वांच्या प्रेमाची आणि ओढीची माया लाल परीने स्वीकारली आणि एका नर्तकीने लाजून लटका द्यावा तसा देऊन ती परीसारखी झेपावत रायगडच्या दिशेनी निघाली.

एखादे वासरू भुकेच्या आकांताने जेव्हा गायीला हाक मारते, तिच्यासाठी केविलवाण्या नजरेत भूक कमी पण आईच्या जिव्हाळाची ओढ असते. जशी ती गाय जवळ येते तेव्हा ते लहानस वासरू आपली शेपूट उडवीत, टूनटून उड्या- मारत आपल्या आईला बिलगते आणि वास्तवाच्या सागरात तुडुंब न्हाहून निघतो. अगदी तशीच ओढ आम्हा सगळयांना लागली होती. कधी एकदा त्या रायगडाच्या पायथ्याशी पोचतो आणि बेभान होऊन स्वराज्याच्या राजधानीच्या धुळीत न्हाऊन निघतो असे झालं...

सगळे नवीन सवंगडी होते, आणि ह्यांना सांभाळण्याची जबाबदारी किरण आणि माझ्यावर होती. सकाळच्या नाष्ट्यासाठी मावशीने खास आम्हा मावळयांना कांदे-पोहे बनवले, चपाती-चटणी सुद्धा सोबत होती, तरीपण पाव आणि जॅम खास करून आणले होते. अशी आमची खाण्याची सोय आम्हीच केली.

लाल परी किल्ले रायगडाचे अंतर हळूहळू कमी करत होती अर्धा एक तासाने ती रामवाडीला थांबली, तिकडे थोडा चहा घेऊन पुन्हा (S.T.) मध्ये जाऊन बसलो. आता (S.T.) थेट महाडला थांबणार होती म्हणून सगळे खुशीतच होतो, हळूहळू आम्ही सगळे मावळे झोपेच्या आधीन होऊन स्वराज्याचा मूक साक्षीदार रायगड किल्लाच्या अवती भवती हे मन फिरू लागलं होत, जेव्हा जाग आली तेव्हा आम्ही महाडला पोहोचलो होतो.

पहाटेचे ४.०० वाजले होते. महाड एस-टी स्थानकात येऊन आमची एस-टी थांबली. जास्त प्रवासी नव्हते पण महाड वरून रायगड किल्ल्या वर जाणारे आणि सांदोशी या गावापर्यंत जाण्यासाठी सकाळी ही एकच एस-टी असल्याने बरेच प्रवासी चढले. पण चालक-वाहक नसल्याने पंचाईत झाली बराच वेळ झाला तरी चालक-वाहक येत नव्हते. आमच्यातील दोघांना याचा बराच कंटाळा आला आणि ते खाली उतरले . आसपास चहाची टपरी शोधण्यास ते समर्थ झाले. दोघांनी मस्त पैकी चहाचा झुरका मारून आले. ३० मि. नंतर एकदाचे चालक-वाहक आले. आणि निघाली गाडी रायगडच्या दिशेने....

५.०० वाजण्याच्या सुमारास आम्ही पाचाड गावी उतरलो. पाचाडला उतरल्यावर शिवरायांच्या जयघोषाने सारा परिसर गर्जून गेला, जणू काही आम्ही आल्याची वर्दीच राजमहालात पोहोचली होती. येथून पुढे रायगडच्या पायथ्याशी आम्हाला पायी जावं लागणार होतं.

तिथेच महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास मंडळाने लावलेला हा दिशादर्शक फलक आपलं लक्ष वेधून घेतो. आम्ही सगळे सोबत, चांदण्यांच्या मंद प्रकाशात रस्त्याच्या कडेन चालत होतो मध्येच आठवण झाली कि आम्ही जे हिंदवी स्वराज्याच्या प्रतिकाचे भगवे निशाण घेतले होते त्याला काठी शोधायची होती, म्हणून उतरून आम्ही शोधू लागलो. भरपूर वेळाने हवी असलेली काठी भेटली

आणि सर्वांच्या चेहऱ्यावर एक स्वःखुशीची लहर येऊन गेली, कारण आता आम्ही अकरा जण नव्हतो तर सोबत होते ते हिंदवी स्वराज्याच्या प्रतिकाचे भगवे निशाण....!

याच भगव्या निशाणासाठी एका तरुण मावळयाने आपला जीव धोक्यात घालून पडता भगवा झेंडा हवेतच उचलून धरला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्नाटक स्वारीत सन १६४८ मध्ये कान्होजी जेधे यांचा जेष्ठ पुत्र बाजी जेधे हा आपल्या सहकाऱ्यांसोबत युद्धात उतरला होता. खळद-बेलसर या ठिकाणी आपले आजोबा रणांगणात पडले असुनही विचलित न होता धैर्याने लढला याच वेळी शत्रूच्या वाराने निशाणधारी घोड्याखाली येऊन निशाण कलले असता बाजीने ते सावरले. अशा त्यांच्या शौर्याबद्दल त्यांना राजगडावर 'सर्जेराव' हा 'किताब छत्रपती शिवाजी महाराजांनी दिला. फक्त एका हिंदवी स्वराज्याच्या प्रतिकाच्या निशाणासाठी मृत्यूला कवटाळले होते.... काय त्याचं स्वराज्य प्रेम असेल, वयाची विशीसुद्धा गाठली नव्हती पण एक भगव्या स्वाभिमानासाठी आपल्या जीवाची पर्वा केली नाही. खरंच आम्ही सगळे आता याच हिंदवी स्वराज्याच्या प्रतिकासोबत गड जवळ करू लागलो होतो.

पहाटेचा गार वारा आमच्या कानाजवळ येऊन हास्य करून गेला. कदाचित आम्ही आलो याचा त्याला आनंद झाला असेल. चंद्र प्रकाशात आम्हाला हिरकणीचा कडा दिसु लागला. चांदण्या लूक-लूक करत आम्हाला न्याहाळत होत्या. बाजूचा परिसर नीट दिसत नव्हता पण शिवकाळात याचं परिसराचे सौंदर्य कस असेल हे स्मृतीत ठेऊन रायगडाचा पायथा जवळ करत होतो. काहीजण महाराजांचे पोवाडे ऐकत होते तर काही ऐतिहासिक घटना सांगत होते पाऊण तास चालल्यानंतर आम्ही रायगडाच्या पायथ्याशी पोचलो.

रायगडाच्या पायथ्याशी आमच्या सारखे अनेक ग्रुप जमा झाले होते. काहींनी वर जाण्यास सुरवात ही केली होती. तर काही चहा-नाश्ता साठी बसले होते. आम्ही सर्वजण ताजेतवाने होऊन चहा-नाश्ता केला. सर्वांनी रायगड दर्शन ग्रुपचे टि-शर्ट परिधान केले. आणि किल्ल्यावर जाण्यासाठी सर्व जण सज्ज झाले. हातात भगवा

मुखात छत्रपती शिवरायांचे नाव घेऊन रायगडाच्या पायरीवर डोके ठेऊन पुढे जाण्यास सुरवात केली. तेव्हा सकाळी ६.१५ मि. झाले होते.

वर चढत असताना किल्ले रायगड हा नाम फलक समोरच दिसून येतो.

रायगड किल्ल्या वर जाताना उजव्या बाजूस खुबलढा बुरुंज लागला. १५ - २० मिनिटे पायऱ्या चढत होतो. पहाटेचा गार वारा असताना सुद्धा घाम येऊ लागला. सोबत असणारी तरतरीत पोर पटपट पाऊल उठवत जात होती पण आम्ही दोघे किरण आणि मी स्वतः जरा दमानेच मार्गक्रमण करीत होतो. पुढे एक दगडाला धरून एक खोपटी होती ज्यात ते सर्व आमच्या साठी थांबले होते. तेव्हा किरणने खिशातून शेंगदाण्याची पुडी आमच्या समोर धरली. सर्वांनी याचा आस्वाद घेतला. आणि सोबत त्याने एक किस्सा पण सांगितला की, शेंगदाणे खाल्ल्याने थकवा दूर होतो.

इथवर पायऱ्यांनी साथ दिली याच्या पुढे पायवाटेने जायचं होत. आता आम्ही वाळसुरीच्या खिंडीत येऊन पोहोचलो. डाव्या बाजुला खोल दरी होती तर उजव्या बाजूस वाळसुरे नावाच गाव दिसत होतं. शिवकाळात याच वाळसुरे मार्गाने प्रतापगडावर ये-जा होत होती. वेळ ६.४५ झाली होती. मान वर करून पाहिलं तर हिरकणीचा कडा मान ताठ करून आमच्यावर नजर ठेवून होता. हातात भगवा घेऊन गड पादाक्रांत करण्यास विलक्षण सुख भासत होते. आता तर उजाडल होत. टकमक टोकाच्या मागून सूर्योदयाच्या किरणांनी आम्हाला दर्शन दिल होत.

टकमक टोकाच्या खाली असणारी तटबंदी आमच लक्ष वेधून घेत होती. त्या ऐतिहासिक वास्तुंना पाहून आमचा थकवा दूर होत होता. महा दरवाज्याच्या टप्प्यात येऊन बाकी सहका़ऱ्यांसाठी जरा थांबलो. २-३ मिनिटांनी पाठीमागून शिवगर्जना ऐकू येऊ लागल्या. पाहतो तर किरण सर्वात पुढे राहून शिवगर्जना घेत येत होता आणि बाकीचे त्याला साथ देत त्यांच्या पाठी येत होते. जेव्हा आम्ही वर जात होतो त्यावेळी इतर मंडळी गड उतार होत होती. आदल्या दिवशी त्यांनी रायगड दर्शन करून घेतले असणार. आम्ही पण काही वेळात महाद्वाराने किल्यात प्रवेश करणार होतो.

असच चालत असता पुढे २ पहारेकरी दृष्टी पथात आले. हो पहारेकरीच....! स्वराज्याच्या राजधानीचे...मराठा साम्राज्याचे पहारेकरीच...! महा दरवाजाला आधार देत उभे असणारे "२ बुरुंज" भर भक्कम असे खांद्याला खांदा लावून उभे होते. मजबूत बांधणी असून एकाची उंची ६५ फुट तर दुस़ऱ्याची ७५ फुट आहे. महाद्वाराची बांधणी गोमुखाच्या आकाराप्रमाणे आहे. याच महाद्वाराची पायरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या व स्वराज्यरक्षक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झाली होती. त्या पायरीवर नतमस्तक होऊन महाद्वार ओलांडून किल्ल्यांत प्रवेश केला. किल्ल्यात प्रवेश केल्यावर डाव्या बाजूस तिकीट देण्यासाठी एक महाशय बसले आहेत त्यांच्या कडून तिकीट घेतले व महाद्वाराजवळ टिपलेले हे क्षणचित्र..

महाद्वाराच्या डाव्या बाजूने बुरुंजाच्या वरच्या बाजूस जाऊन सभोवतालचा प्रदेश पाहिला. आता वेळ झाली होती न्याहारी करण्याची ज्याची सर्व सोय आम्ही

आधीच करून ठेवली होती ती म्हणजे (कांदापोहे). सर्वांनी बुरुंजाच्या बाजूलाच ठाण मांडून शिवरायांच नाव घेऊन न्याहारी करिता सुरवात केली.

बुरुंजावरून किल्ला न्याहाळत असताना एक ग्रुप फोटो. चला लगेच तुम्हाला आमच्या **शिवतीर्थ रायगड दर्शन ग्रुप**ची ओळख करून देतो. ज्याने उजव्या हातात भगवा धरला आहे त्याच नाव - ***रोहित वास्कर, बाजूला हितेश मेंदाडकर, भारत पाटील, किरण वेटकोळी, नवनीत कांबळे, जयेश मेंदाडकर, अनिश पाटील, योगेश दिघीकर, अनिल पाटील (मी स्वतः), अक्षय कांबळे आणि अमृत पाटील.***

इथे जास्त वेळ वाया न दवडता आम्ही वर जाण्यासाठी कूच केली. तिथे आजूबाजूला माकडांची पिल्ले लक्ष वेधून घेत होती. काहीं मिनिटे टाईमपास करून पुढे गेलो. पायरी पायरीने गड चढत असताना मनात आलं कि, आपण १-२ तास चालल्याने आपल्याला थकवा जाणवतोय. पण त्याकाळातील मावळे जे अंधाऱ्या रात्री गड जिंकायचे ते सुद्धा अशक्य मार्गाने जिथून हवा सुध्दा फिरकू शकत नव्हती. काय असतील ते, कसे घडले असतील ते, पन्हाळयाच्या वेढ्याच्या वेळी तर महाराज आणि फक्त ६०० बांदल रात्री ९-१० च्या सुमारास खानाच्या वेढ्यातून सुटका करून अंधाऱ्या रात्री निसटले. लाखाच्या पोशिंद्याला वाचवण्यासाठी पळत होते. काही वेळाने जेव्हा खानाला याची बातमी लागली तेव्हा तो पंधराशेची कडवी फौज घेऊन मागे लागला. सर्वजण खुप थकले होते पण विश्रांती न घेता विशाळगड जवळ करीत होते. सकाळ पर्यंत घोड खिंड गाठली तहान-भुक हरपून संध्याकाळ पर्यंत खिंड लढवुन एकही गनिमाला पुढे जाऊ दिल नाही, स्वतःची बाजी लावली पण विश्रांती घेण्यासाठी थांबले नाही. घोड खिंडीला आपल्या रक्ताने पावन करून राजांना सुखरूपपणे विशाळगडावर पोहोचवण्यास समर्थ झाले. शिवकाळ आठवला कि काही वेळ थकवाच जाणवत नाही.

थोड्या वर अंतरावर येऊन पोहोचल्यावर महादरवाजाचे दिसणारे विहंगम दृश

तसेच थकवा जाणवत नसलेला एक फोटो

आता इथून पुढे दोन वाटा होत्या डावीकडची वाट होळीच्या माळावर जाणारी आणि दुसरी हत्ती तलावा जवळून बाले किल्ल्यात प्रवेश करणारी. आम्ही हि दुसरी वाट निवडली. किल्ला फिरत असताना थकवा न येण्यासाठी आणि ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व आपल्या भाषेत जाणून घेण्यासाठी एक नामी युक्ती केली होती ती म्हणजे मी सर्वाना गडावरील प्रत्येक ठिकाणाची माहिती दिली होती ती त्याने स्वतः इथे सांगायची होती.

आम्ही आता हत्ती तलावाजवळ पोहोचलो ज्याची माहिती भारत पाटील ह्याने दिली. त्या तलावात डोकावून पाहिले असता तळाला थोडस पाणी होत. पण इतका विस्तीर्ण तलाव पाहून वाटलं कि खरच इथे हत्तींसाठी पाण्याची सोय केली असावी. म्हणून याच नाव हत्ती तलाव असे ठेवण्यात आले असेल. इथून पुढे गेल्यावर धर्मशाळा होती.

धर्मशाळेच्या समोरच एका बाजूस अष्टकोनी पाण्याची टाकी आहे. ज्यात बुद्धीचा दाता 'श्रीगणेश' यांचे पितामह, सर्प-चंद्र धारक, ज्यांच्या कपाळावर त्रिनेत्र आहेत तिन्ही लोकांत श्रेष्ठ असे भगवान "श्री शिव शंकर" यांची मांडी घालून ध्यानस्थ असलेली सुबक मूर्ती दृष्टीस पडते. दोन्ही हातात, जटांमध्ये रुद्राक्ष माळा व गळयात सर्प शोभून दिसत आहे. या मुर्तीस पाहून मन अगदि प्रसन्न होऊन गेले.

पुन्हा वाटेवर येऊन पुढे चालत असता समोर दिसतात ते नयनरम्य विजयस्तंभ....! ज्याचे प्रतिबिंब एका तलावात दिसत होते. या तलावात प्रत्यक्षात छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकावेळी अभिषेकासाठी सप्तनद्यांचे आणि सप्त-सागरांची तीर्थे याच तलावात सोडण्यात आली होती. तेव्हा पासून हे तलाव साक्षात एक तीर्थस्थानच बनलं आहे. आणि म्हणूनच या तलावाचे नाव गंगासागर तलाव असे झाले. याची माहिती नवनीत कांबळे याने दिली.

आता पुढे वरच्या बाजूस गेलो जिथे २ जय स्तंभ विराजत होते. जे आज ढासळल्या अवस्थेत जरी असले तरी त्याकाळातील त्यांचा रुबाबदारपणा अजूनही तसाच आहे. तटबंदी अजूनही छाती फुलवून बालेकिल्ल्याचे अस्तित्व सांभाळत आहे. काही जण स्तंभाच्या आतील बाजूस जाऊन त्यांची बांधणी नजरेत साठवत होते. हे स्तंभ द्वादश कोनी असुन प्रत्येक बाजूस खिडकी व बाहेरील बाजूस उत्कृष्ठ नक्षीकाम आहे. या स्तंभाविषयी माहिती रोहित वास्कर याने दिली.



स्तंभाच्या दक्षिणेला बाले किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी एक दरवाजा आहे ज्याचं नाव पालखी दरवाजा असं आहे. दोन्ही बाजूंस कमानी व मधून पालखी जाण्यासाठी योग्य अंतर राखुन असणारी बांधणी. वरच्या बाजूस नक्षी काम असुन आतल्या बाजूस लोखंडी दरवाजा आहे. याची माहिती योगेश दिघीकर याने सांगितली. आत प्रवेश केल्यावर काही पायऱ्या चढून बाल्लेकिल्ल्यात प्रवेश करावा लागतो. या पायऱ्यांवर बसून आमच्यातील किरण वेटकोळी याने छत्रपती श्री. शिवाजी महाराज, छत्रपती श्री. संभाजी महाराज तसेच आऊसाहेब यांच्या नावाचा जयजयकार केला. आणि येथून टिपलेला पालखी दरवाजा व टकमक टोक हे दृश्य दाखवणारा हा फोटो.

आता सर्वांनी बालेकिल्ल्यात प्रवेश केला डाव्या बाजुला बालेकिल्ला अस नामफलक आहे. येथून सुमारे सव्वा दोनशे पाऊले लांबीचा चढउतार असलेला मार्ग आहे जो मेणा दरवाज्यापर्यंत गेला आहे. उजव्या बाजूस असणाऱ्या राणी महालांत आम्ही शिरलो. अवाढव्य असा राणी महाल पाहून आम्ही आश्यर्यचकित झालो. असे सहा राणी महाल होते. ज्याला चहु बाजूनी उंच भिंती आहेत. प्रत्येक राणी महालात दोन चौथरे आहेत जे महालाचे अस्तित्व दर्शवत आहेत.

आतल्या बाजुस एक पडवी होती ज्यात शौचकुप होते. अशी व्यवस्था त्याकाळात दिल्ली-आग्र्यात पण नसेल अशी छत्रपती. शिवाजी महाराजांनी केली होती. ज्याची माहिती किरण वेटकोळी याने दिली. या सहा राणी महालांना आतून जोडणारा एक मार्ग आहे. प्रत्येक दारावर सुबक नक्षीकाम केलेले आहे. शेवटच्या राणी महालाच्या दारातून बाहेर आलो तेव्हा तिथे एक व्यक्ती दही ताक विकण्यासाठी बसली होती. त्यांच्याकडून प्रत्यकाने ताक घेऊन आपल्या अंतरात्म्याला शांत केल.

आता आम्हाला मेणा दरवाज्या मार्गे हिरकणीचा परिसर पाहायचा होता. त्याकरिता मेणा दरवाज्याजवळ आलो ज्याची माहिती अक्षय कांबळे याने दिली. पायऱ्या उतार होऊन ज्या ठिकाणी जाणार होतो ती म्हणजे एका गवळणीच्या पराक्रमाने पावन झालेली जागा म्हणजे हिरकणीचा परिसर, हिरकणीचा बुरुज.

मेणादरवाजाच्या बाजूने जात असता तिथे दोन शिल्प दिसली. दोन दगडावर या शिल्पांना नव्याने बसवण्यात आलेले दिसतात.

येथे २ वाटा होत्या. एक वाट रोपवे कडे जात होती त्या वाटेने आधी रोपवे सेंटर कडे पोहोचलो. डोंगराच्या एका कडेला यंत्र लावून त्याचे दोरखंड खाली असलेल्या सेंटर पर्यंत मजबूत बांधून त्यावर ने-आण करण्यासाठी ३-४ लिफ्ट आहेत ज्यातून काही जण प्रवास करताना आम्ही पाहिले . ज्यांना काही मिनिटात रायगड किल्ल्यावर यायचे असेल तर त्याने येथून यावे. पण खरी मज्जा तर चित दरवाजा पार करून पायरीने महाद्वार ओलांडून किल्ल्यात प्रवेश करणे ज्याला जमते तोच खरा भाग्यवान... आसपासचे गाव व गांधारी नदीचे खोरे येथून स्पष्ट दिसत होते. दूरवर नजर टाकली असता सह्याद्री रांगेतून प्रतापगड रायगडाचे दर्शन घेत आहे असे भासते...

आता आम्ही हिरकणी परिसराकडे वळलो. डाव्या बाजूस शासकीय गृह आहेत तसेच उजव्या बाजूस म्हणजे राणी महालाच्या पाठच्या बाजूस आणखी काही शासकीय गृह आहेत. तिथून थोडेसे अंतर पुढे चालत गेल्यावर समोर एक नाव फलक होता, हिरकणीचा बुरुज...! हिरकणीचा बुरुज पाहण्यासाठी इथून काही अंतर त्या निमुळत्या वाटेने जावे लागणार होते. पण आम्हाला याची माहिती नव्हती व वाट अवघड वाटत असल्याने पुढे जाण्याचे धाडस कोणी केलेच नाही.

मग ठरल्याप्रमाणे मी या स्थळाची माहिती सांगितली. पण मी जेव्हा सांगत होतो तेव्हा माझ्या डोळ्यासमोर व सर्वांच्या नजरेत त्या हिरा नावाच्या गवळणीचे रूप व पराक्रम दिसत होता. किल्ले रायगडासाठी हा भाग कर्दनकाळ ठरणार असता पण ह्या गवळणीच्या पराक्रमाने स्वराज्याला असणारा धोका पुत्रप्रेमापोटी दाखवून दिला होता.

घडाळ्यात सकाळची ९.४५ वेळ दर्शवत होती. आता आम्ही पुन्हा माघारी वळलो पण मेणा दरवाज्याने न जाता राणी महालाच्या पाठच्या बाजूने जाण्यास मार्ग होता तिथून आत गेलो. या पाठच्या बाजूस काही मजूर डागडुगीचे काम करत होते.

राणी महालाच्या बाहेर आल्यावर समोर अष्टप्रधान वाडे व वरच्या बाजूस राजभवनाचा चौथरा होता व खाली डाव्या बाजूस फक्त भिंती आहेत ज्या ४ ते ८ खोल्यांच अस्तित्व दर्शवत आहेत. हे अष्टप्रधान यांच्या राहण्याची सोय होती. ज्या कारभाऱ्यांनी स्वराज्यासाठी छत्रपती शिवाजी राजांसोबत अनेक वर्ष खूप कष्ट व अविरत मेहनत घेतली होती. अष्टप्रधान म्हणजे आठ दिशा ज्या स्वराज्यासाठी अष्ठ बाजुंनी स्वराज्य कारभार पाहत होते.

आम्हीं आता पुन्हा माघारी वळून पालखी दरवाजा कडे पोहोचलो. जिथून राजमहालाकडे जाण्याचा मार्ग होता. राज भवनाकडे वळल्यास डाव्या बाजूस पाण्यासाठी प्रशस्थ हौद आहेत व खालून पाणी जाण्यासाठी झरोके आहेत. येथेच स्नानागार आहे. आतल्या बाजूस एका खोलीत प्रवेश केल्यास शौचकूप आढळते. पुन्हा बाहेर आल्यास आपणास समोरच एक प्रशस्त ८६ फूट लांब ३३ फूट रुंद चौथरा लागतो. ज्याचं काही प्रमाण नसलं तरी आपोआपच प्रत्येकाच्या चरणापासून पादत्राणे निघतात व समोरील चौथऱ्याच्या पायऱ्यांवर डोके ठेवून वंदन करतात. कारण स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज याचे राजभवन हेच आहे. आज

तेथे फक्त दगडाचे चौथरे जरी दिसत असले तरी त्यांच्या मोक्षपद पावन झालेल्या स्थिती आपणास बरच काही सांगून जाते. त्याच चौथऱ्यावर एक नामफलक आहे ज्यावर "***छत्रपती शिवाजी महाराज यांचा राजवाडा***" असे लिहिले आहे.

हाच मराठ्यांचा देव्हारा आहे ज्यात त्यांचा देव नांदत होता. मराठयांचा राजा शिवछत्रपती. प्रत्येक जण येथे मातीच्या कणांपासून इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करत होता. या ठिकाणाची माहिती श्री. किरण वेटकोळी याने सांगितली. त्यात राज्यसरकारची किल्ल्यांबद्दल असणारी शोकांतिका हि व्यक्त केली. याच ठिकाणी हा आणखी एक ग्रुप फोटो.

चौथऱ्यावरून खाली उतरल्यावर एके ठिकाणी जमिनीवर जाळी लावलेली दिसली. त्यात डोकावून पाहिले असता ३ खोल्या दृष्टीस पडतात. पण काही

पुस्तकात असे लिहिले आहे कि येथे अंधार कोठड्या आहेत पण प्रत्यक्षात पाहिले तर धान्याचा कोठार अस नाव फलक लावलेले दिसते. मग याचा नक्की वापर कशासाठी केला आहे हे सांगू शकत नाही.

चौथऱ्याच्या पूर्वेस मेघडंबरीच्या कळसाचे टोक आम्हाला जवळ येण्यासाठी खुणावत होता. आता आम्ही चौथरा उतरू लागलो. समोर सचिवालय आहे जेथून स्वराज्याचे सर्व कामकाज चालत होते. डाव्या हातास वळून एका खोलीत प्रवेश केला जेथे टाकसाळ होती म्हणजे नाणे छपाई कारखाना. शिवरायांच्या सुवर्ण काळात व्यवहारासाठी शिवराई व इतर धातूंचे चलन अशा असंख्य होनांची निमिर्ती येथेच केली जात असे.

स्तंभाच्या पूर्वेकडे एका लहानश्या खोलीच्या कोपऱ्यातून जमिनीच्या आत जाण्यास मार्ग आहे. आठ ते दहा पायऱ्या उतरून आत गेलो कि एका खोलीत प्रवेश करता येतो. येथे एक आश्चर्य घडलं. आम्ही जेव्हा आत प्रवेश करत होतो त्यावेळी अनेश पाटील आपल्या फोनमध्ये व्हिडीओ शूटिंग करत होता .पायऱ्या उतरून तो खलबतखान्यात प्रवेश करणार इतक्यात व्हिडीओ अचानक बंद झाला. काय आश्चर्य काही तांत्रिक समस्या उद्भवली नसताना सुद्धा काय झाल असेल याचाच विचार मी करू लागलो. हि खोली गुप्त बोलणी करण्यासाठी बनवली होती ती आज हि तशीच गुपित राहत असावी.

याच ठिकाणी छत्रपतींची आणि हेरप्रमुख बहिर्जी नाईक यांची बोलणी होत असतील. स्वराज्य हिताकरिता अनेक मनसुबे याच ठिकाणी सुरु झाली असतील. या खोलीच्या भिंतीला हात लावल्यास ओलावा भासत होता. आत दमट वातावरण होते. बाहेर आल्यावर काही जण स्तंभाच्या दिशेने जात होते. आसपासचा परिसर न्याहाळत व हातात निशाणाचा भगवा ध्वज घेऊन मी सुद्धा त्यांच्यापाठी गेलो .

दुर्गदुर्गेश्वर रायगडाच्या विजय स्तंभाची आठवण म्हणून टिपलेले छायाचित्र.....!

आता आम्ही सगळे राजसदरेवर आलो होतो हीच ती राजसदर जिथे गर्विष्ठ मानाही झुकल्या होत्या. राजसदरेवर आल्यावर बत्तीस मणाच्या सिंहासनावर आरूढ झालेली श्री छत्रपती शिवाजी महाराजांसमोर नतमस्तक झालो. सभासद बखर म्हणते, 'तख्त सुवर्णाचे बत्तीस मणांचे सिद्ध करवले. नवरत्ने अमोलिक जितकी कोशात होती, त्यामध्ये शोध करून मोठी मोलाची रत्ने जडाव केली.' हेच ते सिंहासन ज्याने आशिया खंडातील अर्ध्याहून जास्त भागावर अधिराज्य गाजवणाऱ्या मुघल सल्तनतच्या उरात धडकी भरवली होती. सहा पिढ्याची बरबादी ह्या महाराष्ट्राच्या मातीत झाली होती, आणि त्याला कारण हेच हिंदवी स्वराज्याचे सिंहासन... !

आम्ही २७ जानेवारीला गेलो होतो आणि २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त देशातला सर्वात मोठा असलेला म्हणजे लाल किल्ल्यावर जो फडकतो त्यानंतरचा जो मोठा तिरंगा फडकतो तो माझ्या राजाच्या राजधानीवर म्हणजेच रायगड किल्ल्यावर. म्हणूनच म्हटले जाते कि "दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा "... कितीतरी वेळ आम्ही राजांना पाहत होतो.

आज तिरंगा नसला तरी महाराजांसमोर भली मोठी रांगोळी काढलेली आजही सुंदर दिसत होती.

याच ठिकाणी देशातल्या पवित्र अशा सप्त- नद्या व सप्त-सागरांच्या तीर्थाचे निर्मळ जलाने अभिषेक झाला होता. चार वेदांचा जयघोष पुन्हा एकदा भारत खंडात याच ठिकाणी झाला. सुवर्ण मुद्रांचा मेघवर्षाव झाला तोही याच ठिकाणी. सिंहासनापासुन नगारखान्यापर्यंत २२० फुट आणि १२४ फुट रुंद अशी चहु बाजुंनी

भिंत आहे. राजदरबार (सिंहासन) ते समोरील बाजूपर्यंत म्हणजे नगारखान्यापर्यंत अंदाजे ७० पाऊले लांबी आहे. उजव्या बाजूस चौथरे आहेत तसेच डाव्या बाजूस प्रचंड कातळी शिळा आहे.

शिव छत्रपतींना मानाचं मुजरा करत करत माघारी फिरत असताना आम्ही एक अद्‌भुत अशा स्थापत्य कलेचा अविस्मरणीय अनुभव पाहिला. सिंहासनापासून आम्ही नगारखान्यापर्यंत आलो तेव्हा एक मार्गदर्शक (माहितगार) त्या ठिकाणची माहिती देत होता त्याने असे सांगितले कि शिवाजी महाराजांचा दरबार हा विशेष ध्वनी रचनेवर निर्माण केला आहे. या भरलेल्या राज दरबारात कोणी हळू आवाजात बोलले तरी सिंहासनपर्यंत आवाज हा पोहोचला जायचा. त्यात अशी तजवीज होती कि कोणीही हळू आवाजात बोलला तरी त्याचा स्पष्ठ आवाज शिवाजी महाराजांपर्यँत ऐकू जायचे. असे बोलून त्याने एकाला सिंहासनाजवळ पायरीवर उभे राहायला सांगितले व स्वतः नगारखान्याच्या जवळून हळू आवाजात बोलला; त्यावर तिकडून त्या व्यक्तीने बरोबर प्रत्युत्तर दिले. ते पाहून नकळत आमच्या मुखातून....

छत्रपती शिवाजी महाराज कि जय.....!

छत्रपती शिवाजी महाराज कि जय.....!

छत्रपती शिवाजी महाराज कि जय.....!

अशा जयघोषाने नगारखाना गजबजून गेला. यातलं रहस्य अजूनही कोणालाच कळले नाही पण अनेकांनी याचा अनुभव नक्कीच घेतला.

डाव्या बाजूला एक दगडी चौथरा आहे असे म्हणतात कि, शिवकाळात कारंजे होते पण इंग्रजांनी केलेल्या तोफांच्या भडिमारामुळे ते नष्ट झाले असावे. आज त्या ठिकाणी फक्त त्याचे अवशेष दिसतात त्याच कातळ खडकावर आम्ही जेवणाचा बेत केला होता. किरणने भाकरी आणि मिरचीची चटणी आणली होती. मी चपाती आणि तिखट चटणी आणली होती तसेच रोहितने शेंगदाणा चटणी आणली होती. शिवरायांचा शिवकाल अनुभवता आम्हा मावळ्यांना भूक लागली होती. भाकरी आणि चटणीवर असे काही तुटून पडलो कि काही मिनिटांच्या अवधीत पूर्ण जेवण फस्त केले. त्यावेळी समजले की, मावळे आपले जीवन स्वराज्यासाठी कसे जगत असतील. लढाई करताना किंवा एखादया कामगिरीवर असताना तहान भूक लागतच असेल पण स्वराज्यासाठी भाकरीचा शिळा तुकडा आणि मिरची खात खात या स्वराज्यासाठी आपले सर्वस्व अर्पण केले. त्याच्या स्वामी भक्तीला पुन्हा एकदा सलाम...

सकाळी ७.३० ला नास्ता केल्यानंतर अवघ्या साडेतीन तासातच आम्ही जेवण उरकले होते. जेवणांनंतर थोडा वेळ आराम केला त्याचवेळी एक मधमाश्यांची टोळी धांवत आली आणि सोबत धुळीचा प्रचंड लोट आला होता मधमाश्या आल्यावर सगळे जागच्या जागी खाली बसले जणु काही सिंहासनासमोर परत एकदा माना मुजऱ्यासाठी वाकाव्या, अगदी तशाच मुजऱ्यासाठीच झुकल्या असाव्यात! सोबत आलेला धुळीचा लोट, त्या धुळीमुळे सगळयांनी क्षणभर तरी आपआपले डोळे बंद केले. त्याच क्षणात विचार आला की, ह्या मधमाश्या आणि त्यापाठोपाठ आलेला

धुळीचा लोट हि जणु काही आमच्यात नविन शिव-चैतन्य निर्माण करण्यासाठी तर आले नसेल. खरंच असे कितीतरी आनंदाचे व दुःखाचे वादळ या माझ्या रायगड किल्ल्याने अनुभवले असतील. आजही तो असाच खंबीरपणे उभा आहे. समुद्रातील नांवा भरकटल्यावर ज्याप्रमाणे दीपस्तंभ त्यांना योग्य मार्ग दाखवतो, त्याचप्रमाणे हा रायगड इतके आघात सोसूनही आमच्या सारख्या तरुणांना मार्गदर्शक ठरतो. संकटाना असे सामोरे जा कि या नंतरचे येणारे संकट हि आपल्याला या धुळीप्रमाणे वाटेल.

ताजे तवाने होऊन आम्ही नगारखान्याजवळ आलो. तेव्हा सकाळचे ११ वाजून ३५ मिनिटे झाली होती. नगारखान्याची इमारत हि (रायगड किल्ल्यावरील) चौकोनी असून त्यामधूनच होळीच्या माळाकडे जायला रस्ता आहे. या वास्तूवर गेलो कि आपण रायगड किल्ल्यावरील सर्वात उंच अशा ठिकाणी जाऊन पोहोचतो. आम्ही नगारखान्यावरील गंड-भेरूंडाची चित्रे पाहिली, त्यावर उठावदार कमळे पाहिली. या नगारखान्याची माहिती अमृत पाटीलने मराठी (कोळी) आणि हिंदी दोन्ही भाषेत सांगितली. थोडे हसू आले पण सावरून घेतले.

नगारखान्यातुन बाहेर आल्यावर दोन वाटा लागतात उजवीकडे उतरल्यास कुशावर्त तलाव लागते. आणि डावी वाट होळीच्या माळावर जाते. आम्ही सरळ होळीच्या माळाकडे निघालो. तिथे छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती स्थापन केली आहे. त्या ठिकाणी छत्रपतींच्या चरणावर फुले अर्पण केली. सर्वांनी छत्रपतींसमोर फोटो काढले. दुपारचे १२ वाजले होते. भर दुपारी आम्ही आता बाजारपेठेजवळ जाऊन पोहोचलो.

होळीच्या माळाला धरूनच पुढे बाजारपेठ आहे. एका बाजूला २२ खोल्या रांगेत होत्या आणि त्याच्या समोरच त्याच आकाराच्या २२ खोल्या आहेत. त्या समोर-समोरील खोल्यामधील अंतर सुमारे ४० फूट आहे. यास बाजारपेठ हे नाव दिले गेले आहे. या बाजारपेठेचे वर्णन हितेश मेंदाडकरने एखादा पोवाडा बोलावं त्याप्रमाणे आम्हा सर्वाना सांगितले.

बाजारपेठेतून पुढे जात असता एका ठिकाणी सर्पाकार आकृती कोरलेली आहे असे म्हणतात की, शिवरायांच्या काळात त्या ठिकाणी एक व्यापारी होता त्याच नाव नागशेट्टी. याबद्दल अशी आख्यायिका आहे की, या व्यापाऱ्याने शिवरायांना विनंती केली की या ठिकाणी भरपूर माणसे, व्यापारी माझ्या शोधात येतात, जर या दुकानाला माझे नाव दिले तर त्यांच्या सोईचे होईल. पण शिवरायांनी हे मान्य केले नाही. खरच शिवरायांनी त्या व्यापाऱ्याला त्यासाठी मान्यता दिली नाही कारण त्यांनी जितके किल्ले जिंकले. त्यावर स्वतःचे, ना कुटुंबियांचे किंवा आपल्या आप्त-स्वकीयांचे किंवा खास मावळ्यांपैकी एकाचेहि नाव दिले नाही. स्वतः स्वराज्याचा राजा असूनही शिवरायांनी आपल्या नावाची एक पाटी देखील कोणत्याच किल्ल्यावर कोरली नाही. यातच शिवरायांनी स्वराज्य स्थापन करण्याबद्दल नेमकं काय धोरण असेल ते स्पष्ठ होत. यावर त्या व्यापाऱ्याने नाव नाही पण खुण म्हणून सर्पाकृती चिन्ह कोरण्यात यावे हि मान्यता आपल्या पदरात पाडून घेतली.

स्वराज्य म्हणजे स्वतःचे राज्य... हर एक शेतकऱ्याचे, मावळ्यांचे, स्वराज्यात राहणाऱ्या प्रत्येकाचे आणि म्हणूनच स्वतः राजे होऊनही आपलं नाव कुठेच दिले नाही, नाहीतर आपण..... आपण थोडं काही नवीन केलं कि त्यामध्ये आपल नाव लिहितोच, कारण याबद्दल आपली भावनाच अशी असते कि हे मी केलय. शिवाजी महाराजांना आपले सद्गुरू 'श्री रामदास स्वामींनी' सांगितले की "हे राज्य व्हावे हीच श्रींची इच्छा" आणि त्यानुसार अखेरपर्यंत वचनबद्ध राहिले. आज महाराष्ट्रातल्या हर एक किल्ल्यावर शिव-छत्रपतींचे नाव अगोदर येते. खरंच खूप नशीब थोर कि ज्या देशात, ज्या राज्यात, शिवबा जन्मला त्या ठिकाणी आपला जन्म झाला.

बाजारपेठेतल्या खोल्यांच्या भिंतीवर उभे राहून आम्ही राजगड, तोरणा दिसतो काय ते पाहत होतो. बराच वेळ झाला पण काही

समजले नाही मग त्या तुटलेल्या खोल्यांवरून डौलाने भगवा फडकावून आमचा मोर्चा जगदीश्वर मंदिराकडे वळविला. भर दुपारची वेळ होती आणि जाताना समोर एक आईस्क्रीम वाली होती, तिच्या कडून सगळयांसाठी आईस्क्रीम घेतल्या व त्याचा आस्वाद जगदीश्वराच्या मंदिरा बाहेर पोचलो तेव्हा दुपारचे १२ वाजून २० मिनिटे झाली होती. जगदीश्वराच्या मंदिरा भोवती एक कोट आहे, त्याच्या बाहेरच एका जागेत सर्वांनी आपापली पादत्राणे काढून आत प्रवेश केला. मंदिरासमोर नंदीची सुबक अशी भव्य मूर्ती आहे. मंदिरात गेलो कि सभामंडप लागतो. त्यात बरोबर मध्यभागी कासवाकृती आहे आणि समोर जगदीश्वराच्या मंदिराचा गाभारा आहे. गाभाऱ्याच्या उजव्या भिंतीला हनुमंत स्वारीची मूर्ती ठेवलेली आहे. ती सुद्धा तुटलेल्या अवस्थेत आहे. सर्वानी कासवाचे आणि हनुमंत स्वारींचे दर्शन घेतले व गाभाऱ्याकडे वळलो. गाभाऱ्यात शिरताच दरवाज्यावर बरोबर मध्यभागी शेंदुरानी सजलेली सुबक अशी श्री गणेशाची मूर्ती आहे. श्री गणरायाला नमस्कार करून आम्ही सर्वजण आत आलो.

जगदीश्वराच्या गाभाऱ्यात गेल्यावर शिवलिंग पाहून मन अगदी आनंदाने भरुन गेले. ते दगडी शिवलिंग जणू काही साक्षात शंकराचा आत्माच आहे असे वाटले. कारण अशाच रायरेश्वराच्या मंदिरात वयाच्या सोळाव्या वर्षी शंकराच्या पिंडीसमोर उभे राहून, आपल्या करंगळीच्या रक्ताचा अभिषेक वाहून स्वराज्य निर्मितीची भीष्म प्रतिज्ञा शिवरायांनी आपल्या मावळ्यांच्या सोबत घेतली होती. आणि नव स्वराज्याचे तोरण "तोरणा" किल्ला घेऊन बांधले होते. आजही क्षणभरतरी त्या रायरेश्वरासमोरच आपण आहोत अस वाटलं. आणि त्याच भक्ती-प्रेमाने आम्ही सोबत आणलेल्या श्रीफळाचा प्रसाद शिवपिंडीसमोर ठेवला व पुष्पसुमनांनी पूजा-अर्चा केली.

जेव्हा शिवलिंगावर मस्तक ठेवल तेव्हा नकळत अश्रू ओघळत पिंडीवर पडले होते. ज्या राजांनी आपल्या स्वराज्यासाठी इतके काही केलय त्यासाठी थोडं काहीतरी करावं हिच भावना मनातुन अश्रूंच्या रूपाने ओघळत होती स्वतःला सावरून घेतले. सर्वांनी पुजा केली व या क्षणाची आठवण रहावी म्हणून सोबत फोटो काढले मन धजावत नसतानाही जगदीश्वराच्या गाभाऱ्यातून बाहेर आलो.

शिव-प्रासादातून बाहेर येताच पुर्ण लक्ष श्रींच्या समाधीकडे गेलं व तिकडेच पाय जाऊन थांबले.

छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी हि अष्ठकोनी आहे त्यावर चौथरा असून वर घुमटाकार बांधणी केली आहे. १९२६ साली या शिव समाधीचा जीर्णोद्धार झाला. कितीतरी वादळे, ऊन-पाऊस अश्या नैसर्गिक आणि मानवी संकटाना झुंजून हि समाधी आज निर्धास्त आहे. याच ठिकाणी शिव-छत्रपती शिवाजी राजांचे दहन केले. एका मानवी नीतिमूल्यांची मूर्तिमंत खाण याच ठिकाणी गुप्त झाली. त्या समाधी समोर प्रजासत्ताक दिनानिमित्त रांगोळी काढलेली होती. शिवरायांची अर्धाकृती मूर्ती ठेवलेली आहे. दुरूनच त्या ठिकाणी नतमस्तक झालो. युगाच्या युगप्रवर्तकाची हि समाधी, ज्याने स्वराज्याचा भगवा ध्वज मानाने असा काही धरून ठेवला की याच मराठी सत्तेने मोघलांचे नामोनिशाण मिटवून टाकले. राजांबद्दल शब्दही अपुरे आहेत, त्या ठिकाणी फोटो काढून बाजूला झालो.

बाजूला वाघ्या कुत्र्याची समाधी आहे त्याबद्दलही एक आख्यायिका आहे, पण खरी कि खोटी नक्की समजत नाही. शिव-समाधी समोरच म्हणजेच जगदीश्वराच्या मंदिराची जी भिंत होती त्यात एक शिलालेख पाहिला. तो शिलालेख होता स्वराज्याची राजधानीसहित अनेक किल्ले ज्यांच्या अभियांत्रिकी मार्गदर्शनाखाली बनवले गेले त्या महान स्वामिनिष्ठ सेवकाची ज्याचं नाव होत हिरोजी इंदुलकर कोणी इटळकर असेही म्हणतात.

शिव समाधीचे पुन्हा दर्शन घेतले. व बाहेर पडत असताना आमचं लक्ष आणखी एका शिलालेखावर गेलं. जेव्हा आम्ही जगदीश्वराच्या प्रासादातून बाहेर आलो तेव्हा नकळत आम्ही हे नाव कोरलेलं शिल्प पाहिलच नाही. जगदीश्वराच्या मंदिराच्या प्रवेशद्वारातील पायरीच्या खाली एका दगडावर हिरोजी इटळकर या त्यांच्या कोरलेल्या हर एक अक्षरागणिक त्यांची स्वराज्याबद्दल आणि शिवाजी राजांबद्दल असणारी स्वामिनिष्ठा दिसून येते.

हिरोजी इंदुलकरांना शिवरायांनी रायगडावर राजधानी बनवण्यासाठी सांगितले. सगळा प्रस्ताव मांडून झाल्यावर त्यासाठी लागणारी दौलत देऊन शिवराय आपल्या स्वारी करत निघून गेले. जसजशी रायगडावर इमारती, तलाव, राजदरबार, सदने, मंदिरे होत होती. तसतशी हि दौलत त्यात खर्ची होत होती. एकवेळ अशी आली की सर्व धन संपले पण या स्वामिनिष्ठ सेवकाने आपले काम थांबविले नाही. असे म्हणतात कि यांनी आपले राहते घर, शेती-वाडी विकून स्वराज्याच्या राजधानीचे काम अविरतपणे चालू ठेवले.

रायगडावर सगळी कामे झाल्यावर जेव्हा शिवराय गडावर आले तेव्हा त्यांना याची माहिती कळली. त्यांनी अगोदर पूर्ण किल्ला फिरून घेतला व म्हणाले कि आमच्या जसा मनात होता त्याहीपेक्षा आणि उत्कृष्ट तुम्ही बनवलात. या बदल्यात तुम्हाला काही हवं असेल तर निसंकोचपणे मागा. पण हिरोजी इंदुलकरांनी त्याबद्दल असे काही मागितले कि ज्याने शिवरायांचेहि डोळे पाणावले असतील. हिरोजींनी शिवरायांना सांगितले कि, मला धन-दौलत काही नको फक्त मला माझ्या नावाची एक पाटी जगदीश्वराच्या प्रवेशदाराच्या पायरीखाली बसवायची आहे. हेतू हाच कि जेव्हा जेव्हा तुम्ही रायगडावर याल तेव्हा तेव्हा नक्कीच जगदीश्वराच्या मंदिरात प्रवेश करताना तुमच्या पायाची धूळ माझ्या नावावर पडेल ज्याने माझ्या जन्माचा उद्धार होईल. धन्य धन्य ती स्वामी भक्ती.....

रायगडावर केलेल्या सर्व बांधकामाची यादी थोडक्यात या शिलालेखात नमूद केली आहे.

आजवर मी ऐकलं होत कि पांडुरंगाच दर्शन घेण्याअगोदर भक्त पुंडलिकाच दर्शन घ्यावं लागत. आणि आज या ठिकाणी मी अनुभवलं कि (खरंच हिरोजी इंदुलकरांची स्वामीभक्ती पुंडलिकासारखी होती). या थोर अभियंत्याचे नाव पायरीवर कोरले आहे ते शिल्प...!

त्या स्वामी भक्तीवर लिहिणे हि कठीण तो अनुभव याची देही पाहून पुन्हा मंदिरात आलो आणि सभामंडपाभोवती सगळी मंडळी बसली होती. कोणी फोटो पाहत होते तर कोणी येणाऱ्या थंडगार हवेत समाधिस्त होत होते. मी हि थोडावेळ आराम केला पण मन बेचैन झालं होत.

शिवरायांनी स्थापन केलेले स्वराज वाढवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी कितीतरी मावळ्यांनी आपले प्राण हसत-हसत दिले होते. समरांगणात लढणारे बाजी प्रभू आठवले. कोंढाण्याचा सिंह डोळ्यासमोर उभा राहिला. फक्त साठ



मावळयानिशी लढणारा कोंडाजी फर्जंद आपल्या राजासाठी मृत्युशय्येवर झोपणारा हिरोजी फर्जंद असे कितीतरी, ज्याची नावे इतिहासात नोंदही नसतील असे मावळे लढले स्वराज्यासाठी, आपल्या धन्यासाठी, मायभूमीसाठी, नव्हेतर आपल्यासाठी आणि आपण काय करतोय? कारण हि तसच आहे जेव्हा मी कामानिमित्त गुजरातला गेलो होतो तेव्हा तिकडच्या व्यक्तीनी मला विचारले होत कि तुम्ही शिवाजी राजांची पुजा का करता ? तो देव होता काय ? मनात विचार केला आणि सांगितलं होत कि नाही देव नव्हता पण एक मात्र नक्की कि छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच आज आमचे देव मंदिरात आहेत.

तेव्हा एक निर्णय घेतला झालं गेलं गंगेला मिळालं पण यापुढे तरी महिन्यातून नाहीतर ३ महिन्यातून एकदातरी माझ्या राजांचे पाय ज्या-ज्या किल्ल्यांवर लागलेत त्याची धूळ मस्तकावर लागावी म्हणुन गड-कोट करावेत. माझ्या राजांचा इतिहास अभिमानाने इतरांना सांगावा. आणि हाच मनोदय मी किरणला सांगितला त्यालाही तो पटला आणि ठरवलं कि याच शिव मंदिरासमोर आम्ही नक्कीच गडकोट करून थोडंतरी शिवाजींच्या भूमीत जन्मल्याचा पांग फेडणार.

त्यानंतर आम्ही सर्वजण टकमक टोकाकडे गेलो. तिथे गेल्यावर असे वाटले कि रायगड जणू काही निसर्गालाच आव्हान देतोय. खरंच दिड-गाव तासीव कडा आहे तिकडे हवाही जोरात होती जास्त वेळ न घेता आम्ही पर्यायी पायवाटेने महाद्वाराकडे निघालो. निघताना पुन्हा एकदा लक्ष त्या टकमक टोकांकडे गेले व त्या टकमक टोकावरच्या भगव्या निशाणाकडे.



तिकडे भगवा झेंडा डौलाने फडकत होता. हळूहळू आम्ही सर्वजण महादरवाजाकडे आलो. महादरवाजाजवळ येताना शाळेची लहान मुले किल्ल्यावर येताना दिसली. इयत्ता ५ वी - ६ वी मधली असावी, दोन-दोन मुलांचा गट करून *'छत्रपती शिवाजी महाराज कि जय'* असं बोलत एक-एक पायरीने किल्ला चढत होते. त्याचा चेहऱ्यावर कोणताच थकवा दिसत नव्हता त्यांची किल्ल्यावर यायची धडपड पाहून आम्हाला पण आमचं बालपण आठवलं. किल्ल्यावर खूप गर्दी होत होती. पुन्हा मनभरून किल्ल्याकडे पाहिले आणि महादरवाजातून बाहेर पडलो.

हातात भगवे निशाण घेऊनच उतरत होतो. उतरताना एकदाच उतरण आली कि पायऱ्यांवरून उतरतानाही पाय थर-थर कापत होते. मधेच एका वाटेत वयस्कर आजीबाई दिसली. काय ती ओढ असेल तिची? न राहवून निशाणेची काठी त्या आजीबाईना दिली व भगवा झेंडा बॅग मध्ये ठेवला. आमच्या सोबतचे पटापट उतरत होते अपवाद फक्त मी आणि किरण याचाच आम्ही हळूहळू गडाखाली येत होतो. तोच आमच्या मावळ्यांचे हात दिसू लागले.

ते आम्हाला लवकर खाली बोलावत होते. त्यांनी आमच्या अगोदरच गाडीची सोय केली होती. धावत-धावत आम्ही गडाखाली आलो. शेवटच्या पायरीवर पुन्हा एकदा डोके ठेवले. रायगड किल्ल्यावर पाहिले, जणू काही रायगड किल्ला अभिमानाने आमच्याकडे बघत होता. नकळत हसत गडबडीने गाडी जवळ आलो. गाडी माणगाव पर्यंत होती हे ऐकून जरासं मन हलकं झालं. आता आमच्या परतीचा प्रवास सुरु झाला. गाडीमध्ये बसून माणगावकडे निघालो. पाचाडच्या माँसाहेबांच्या वाड्याला व समाधीला दुरूनच दंडवत केला. नजर राजगडच्या टकमक टोकावरच जात होती. गाडी वळणदार वळणे घेत घेत रायगड किल्ल्यापासून आम्हाला दूर घेऊन जात होती तरी सारखी सारखी नजर दुर्गराज रायगडावरच होती आणि शेवट टकमक टोकावरच थांबत होती.

माणगांव रेल्वेस्टेशनवर उतरलो व दिवा पॅसेंजर ची वाट पाहत होतो. थोड्याच वेळात दिवा सावंतवाडी ट्रेन आली आणि योगायोगाने आम्हाला बसायला पण भेटलं. ट्रेन चालू झाली तसे डोळे मिटले पण मन मात्र दुर्गराज रायगडावरच फिरत होत. महाद्वारा-पासून ते राज सिंहासन , होळीच्या माळापासून ते जगदीश्वर मंदिर व अखेर श्री समाधीपासून टकमक टोकावर जाऊन स्थिरावत होत. टकमक टोकावरचा भगवा झेंडा डोळ्यासमोर उभा राहू लागला आणि मनातच शब्द उमटले...

राहीन असाच फडकत

वाऱ्यालाही देईन आव्हान.....

काय भीती ऊन आणि पावसाची

आशिर्वाद माझ्यावर प्रभो शिवरायांची.....!

प्रभो

शिवरायांची.....!

रायगड हे स्वातंत्र्याचे महातीर्थ आहे

स्वातंत्र सैनिकांची गया-वाराणसी

महाराष्ट्रीय संस्कृतीची ती गंगोत्री आहे

पुरुषार्थ आणि पराक्रम यांचे ते प्रेरणास्थान आहे.

"जो जो महाराष्ट्र देशी जन्मला

त्या प्रत्येकाने जन्मातुन

एकदा तरी रायगडाची

वारी केलीच पाहिजे "

"गोपाळ नीलकंठ दांडेकर" या दुर्गप्रेमी लेखकाने आपल्या प्रभावी लेखणीने *"शिवतीर्थ रायगड"*या पुस्तकामध्ये रायगडाची जीवनगाथा मांडली आहे. त्यात मला भावलेले शिवतीर्थ रायगडाची स्तुतीसुमने तुमच्या समोर सादर केली आहेत. या पुस्तकाच्या आधारे आम्ही किल्ले रायगडाचे भ्रमण पूर्ण केले.

ई साहित्य प्रतिष्ठान

महा-राष्ट्र

महाराष्ट्राहून श्रीमंत असं जगात कोणतंही राज्य, देश, खंड नाही. संपूर्ण जगातील लेण्यांपैकी निम्मी लेणी भारतात आहेत आणि भारतातील १२०० लेण्यांपैकी ९०० एकट्या महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक तालुक्यात एक किल्ला आहे (358 तालुके- ४५० किल्ले) आणि संपूर्ण जगात इतक्या जास्त प्रमाणात किल्ले कुठेही नाहीत. कारण इतक्या मोठ्या प्रमाणात लढाया लढणारी जमात जगाच्या पाठीवर कुठे नसेल. आणि अशा लढवय्या पूर्वजांचे आपण वंशज आहोत याचा हे किल्ले हा पुरावा आहे.

ई साहित्यतर्फे गेली अनेक वर्षे दुर्ग दुर्घट भारी नावाची एक सिरीज चालू आहे. आपल्या आजूबाजूला असलेल्या किंवा आपण भेट दिलेल्या दुर्गाची माहिती व फ़ोटो कृपया आम्हाला पाठवा. आम्ही त्याचे पुस्तक बनवून आपल्या नावाने ते प्रसिद्ध करू. त्याचा उपयोग करून लोक या दुर्गांना भेट देऊन या श्रीमंतीचा अनुभव घेतील.

चला तर लिहा आणि पाठवा : esahity@gmail.com

सुनील सामंत

टीम ई साहित्य